महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/महिला सुरक्षा/२०२२/ 5752 दिनांक : 12 DEC 2022

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय :- महाविद्यालयीन विद्यार्थीनी तसेच महिला शिक्षकांच्या सुरक्षिततेबाबत दिनांक ३०.११.२०२२ च्या बैठकीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

संदर्भ : - १) संचालनालयाचे पत्र क्र.३/संकीर्ण-२०२२/महिला सुरक्षा/२०२२/३० दिनांक ०९.१२.२०२२

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिनस्त सर्व व्यावसायिक संस्थांच्या संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, महाविद्यालयीन विद्यार्थीनी तसेच महिला शिक्षकांच्या सुरक्षितता या विषयाच्या अनुषंगाने, दिनांक ३०.११.२०२२ रोजी मा. उप सभापती (विधान परिषद) यांचे कार्यालय, विधान भवन येथे बैठक आयोजित झालेली होती. सदर बैठकीत प्राप्त निर्देशानुसार **महाविद्यालयीन विद्यार्थीनी तसेच महिला शिक्षकांच्या/कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबतची माहिती तातडीने वरिष्ठ कार्यालयास सादर** करावयाची असल्याने, सदरची माहिती सादर करण्यासाठी यासंबंधी गुगल फार्म लिंक देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सदर लिंकवर **आजच दिनांक १२.१२.२०२२ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत** या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थाप्रमूख यांनी माहिती सादर करावी. सदर माहिती संवेदनशील असल्याने गुगल फार्ममध्ये **अचूक व विहीत मुदतीत** माहिती भरली जाईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

(डॉ द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.022-68597423/67, ई-मेल-desk3@dtemaharashtra.gov.in,
वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

जा क्र. 3/ संकीर्ण-2022/महिला सुरक्षा/ 2022/ 30 दिनांक: 09/12/2022

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/ नागपूर

विषय- महाविद्यालयीन विद्यार्थीनी तसेच महिला शिक्षकांच्या सुरक्षिततेबाबत दिनांक 30/11/2022 च्या बैठकीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही

संदर्भ- (1) उच्च व तंत्र शिक्षण विभाग कार्यासन विशि-3 यांचे पत्र क्र. बैठक-2022/ प्र. क्र. 274/विशि-3 याणचे दिनांक 20/1/2022 रोजीचे पत्र

(2) विश्वविद्यालय अनुदान आयोग, शिक्षा मंत्रालय भारत सरकार यांचे 2/7/2022 रोजीचे पत्र

(3) उच्च व तंत्र शिक्षण विभाग याकहे पत्र क्र. संकीर्ण 2022/प्र. क्र. 137/विशि-5 दिनांक 1/12/2022

महाविद्यालयीन विद्यार्थीनी तसेच महिला शिक्षकांच्या सुरक्षितता या विषयाच्या अनुषंगाने, दिनांक 30/11/2022 रोजी मा. उप सभापती (विधान परिषद) यांचे कार्यालय, विधान भवन येथे बैठक आयोजीत झालेली होती. सदर बैठकीत प्राप्त निर्देशनानुसार महाविद्यालयीन विद्यार्थीनी तसेच महिला शिक्षकांच्या/ कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबतची माहिती संदर्भ क्र. (2) नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तक्यानुसार तयार करावी.

तरी आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठ व महाविद्यालयांची माहिती पाठविण्याकरिता आपल्या ईमेल आयडीवर Google Sheet ची लिंक share करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर माहिती तात्काळ दोन दिवसात Google Sheet वर भरण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य मुंबई

सोबत: वरील प्रमाणे